म. ग्रं. मं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. २०२

॥ श्री ॥

॥ राष्ट्रदेवता प्रसन्न ॥

वीरमणि

# बाजीप्रभु देशपांडे यांचा

# पोवाडा

शाहीरः— पांडुरंग दत्तात्रेय खाडिलकर,
बी. ए. (ऑनर्स)

वाई.

किंमत १॥ आणा.

लौकरच प्रसिद्ध होईल ! स्वरित नांवें नोंदवा ! !

स्वर्गस्थ स्वामीजींचे मराठी भाषेंतील पहिलेंच चरित्र

चार फोटो ) **संन्यासी श्रद्धानंद** ( किं. १ रु.

१५० पृष्ठें ) ( ट. ख. नि.

लेखक—श्री. शंकर वामन देशपांडे

मागविण्याचा पत्ता—तरुण हिंदुस्थान प्रकाशक मंडळ,

किर्लोस्कर भुवन, गिरगांव, मुंबई.

---

( सांगलीचे प्रसिद्ध राजवैद्य दामूतात्या खांवारे यांच्या अनुभवीक व शास्त्रीय पाठाप्रमाणें तयार केलेलीं. )

# खाडिलकरांचीं गुणकारक औषधें

जरूर ] अत्यंत पौष्टीक रसायन [ अनुभव घ्या

## खाडिलकरांचा सुवर्णराज वंगेश्वर

किंमत एक तोळ्यास ४ रु. तीन तोळ्यास ११ रु. ५ तोळ्यास १५ रु.

## खाडिलकरांचें कुमारी आसव

किं. ४ औंसी बाटलीस ८ आणे. १ पौंडी बाटलीस १ रु. ६ आणे.

## खाडिलकरांचें द्राक्षासव

किं. ४ औं. बाटली ८ आणे. १ पौंडी बा. १ रु. ६

## खास दम्याकरितां खाडिलकरांचा अस्थमास्पेसिफिक म्हणजे दमाधूप

किंमत डब्यास दीड रुपया.

## खाडिलकरांचा अडुळसा-अवलेह

किंमत १० तोळ्यास ८ आणे.

खालील पत्त्यावर मागणी व पत्रव्यवहार करावा.

**म्यानेजर खाडिलकरांचें शास्त्रोक्त औषधालय, सांगली (S.M.C.)**

# प्रस्तावना.

ज्या थोर विभूतींनीं या भरतखंडावर अनंत उपकार करून ठेविले आहेत, त्यांचा गुणगौरव करणें हें, एक पडत्या काळांतील राष्ट्राचें—या भरतखंडाचें—अत्यंत निकडीचें कर्तव्यकर्म आहे. त्यांच्या गुणस्मरणाच्या योगानें नवें चैतन्य खेळूं लागतें व हें नवें चैतन्यच इष्ट हेतु प्राप्त करून देण्यास कारणीभूत होतें.

'बाजी प्रभु देशपांडे' या नरश्रेष्ठांचा गुणगौरव पुष्कळ कवींनी, शाहिरांनीं, वक्त्यांनीं व लेखकांनीं केलाच आहे. पण आपणहि कांहीं स्तुति करून थोडेंसें उतराई व्हावें याच उद्देशानें हा पोवाडा प्रसिद्ध केला आहे. 'तानाजीचें पहिलें पुष्प' ज्याप्रमाणें लोकादरास पात्र झालें आहे तसेंच हेंहि बाजीचें दुसरें पुष्प होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

पोवाडा लिहितेवेळीं कांहीं महत्वाच्या सूचना श्रीयुत शंकर विठ्ठल लेले, चिटणीस प्राज्ञपाठशाळा यांनीं अतिशय कार्यव्यग्र असतांहि केल्या त्याबद्दल त्यांचें आह्मी मनःपूर्वक अभिनंदन करतों. तसेंच 'श्री दत्तात्रय' प्रेसचे मालक 'श्री. कृ. प्र. खाडिलकर' ह्यांनीं तो अगदीं थोड्या वेळांत छापून दिला, याबद्दल त्यांचेहि आह्मी फार आभारी आहों.

वाई,
मिति पौष शु॥ ५ शके १८४

शाहीर.

॥ श्रीराष्ट्रदेवता प्रसन्न ॥

# वीरमणि बाजीप्रभु देशपांडे यांचा

# पोवाडा

( शाहीरः—पांडुरंग दत्तात्रेय खाडिलकर बी. ए. )

---

( चालः—धन्य धन्य शहाजी० )

धन्य धन्य बाजी रणवीर, धन्य अवतार । धन्य तो शूर, धर्माच्या कार्मी जो जो मरणार, त्याचा जयनाद जो जो होणार । शाहीर पांडुरंग गाणार ॥ धृ० ॥

## ( चौक १ ला. )

अफझुल्लाला ठार केल्यावर, झालं विजापूर, भीतिनं गार, शाहा मग झाला मोठा बेजार, फार मोठं झालं त्याला बेजार, जडला जणुं घोर त्याला आजार ॥ सारे अमीर करिती विचार, आतां जाणार, गांव विजापुर, लौकर सैतानाच्या कबजांत, होणार सारा घोर आकांत, साधावा कैसा त्याचा हो घात ॥ अफझुल्लाचा मुलगा फाजलखान, झाला हैराण, सुचेना त्याला आन, सूडानं घेरलं त्याच्या हृदयास, येईना झोप झाला कडु घांस, अंगाचं आटलं त्याच्या लइ मांस । सदा झाला शिवराचा काळ, लागली तळमळ, परि तो दुर्बळ, एकला काय शिवाला करणार, सिंहाला कोल्हा कसा हो धरणार, मुंगसाला साप काय करणार ॥ चाल ॥ एके दिशीं अफझुल फाजलाच्या स्वप्नामधीं आला ॥ बापाला आपल्या पाहून फाजल दचकला ॥ अफझुल्ला तंवा बोलला आपल्या लेकाला ॥ "ऊठ कारट्या काय निजलास । गोड

लागतो काय रे तुला घांस । नेमळट पोरट्या झालास । त्यानेमानें शीर कापुन टांगलं किल्यास ॥ तंवा फौज घेऊन तयार लेका होतास । ततून मुर्खा पळुन जाऊन राखल जिवास । मरणाला भिऱ्या भ्यालास । चल त्याचं मुंडकं आणुन टांग वेशीस " । असा झाला फाजलाला भास। विसरला देहभानास। ताडकन उठून तलवार लावली कमरेस । खडखडा दार उघडून गांठलं वेशिस । वेशीच्या वरच्या वाशास । टांगलेलं होतं लई दीस । रामरायाचं मुंडकं; मग त्यास । तलवार मारुन बोलला तंवा कवटीस ॥ "झालं सरलं आतां तुझ दीस । तुं पड आतां धरणीस । टांगीन इथं शिव्याचं मुंडकं मी खास " ॥ ( चाल ) असं ह्मणुन फिरला माघारा । गेला झरझरा । आपल्या घराला । रात्र ती झाली कष्टमय फार । सूडाचा झाला त्याचा निर्धार । ऐकावा पुढच्या सारा प्रकार ॥ १ ॥

३९६८

## ( चौक २ रा. )

दुसरे दिवशीं गेला दरबाराला । बोलला अदिल्शाला । " गप्प काय बसला । आला सैतान विजापुरला । समजावा नाश सकल झाला । त्याचा काय बंदोबस्त केला ? ॥ पाचोळा जसा वाऱ्याला । रान वणव्याला । दिवटी सूर्याला । आदिल्शहा तसा शिवाजीला । झाला काय सांगा गव मजला । पाहिजे आपला विचार कळला ॥ दरबारी थोर अमीर, । भले झुंजार, । पाटवुनी चूर । शत्रुचा करा आज सरकार । नाहींतर आपला नाश होणार । शाहिचं चांगलं दिवस सरणार " ॥ आदिल्शाहा घाबरुन गेला । बोलला फाजलाला । "शिद्दी जोहाराला । घेऊन करा तुह्मी त्याला ठार । नंतर करुन मोठा दरबार । थाटानं देऊं तुह्मा तलवार ॥ चाल ॥ फाजलखान शिद्दीजोहार झाले तय्यार ॥ मेजवान्या त्यांना थाटाच्या झाल्या घरोघर ॥ त्यांनीं फौज घेतालि भरपूर । दारुगोळा केला तय्यार । किती घोडा होता गणतिला नाहीहो पार ॥ घोड्यांना घातले अलंकार । पायात्नं बांधले

डोक्याला लावले पिसार । मग वरती चढली खोगीर । त्यांवर बसले रणशूर । बडेबडे होते अमीर ! ते सारे झाले तय्यार । हातांत नंगी तलवार । अशी फौज चालली गलिमाला कराया ठार ॥ जंवा तळ ज[illegible]ांना देती । तंवा ऐका काय काय करिती । मोठमोठे डेरे लावती । गांजाचा नाद हो अती । अक्षि धिऊन झिंगुन जाती । मग नाचरंग चालती । त्यांचा थाट सांगावा किती ! ॥ त्यांना दाणा वैरण किती । लागे त्याला नाहीं गणती । गरिबांना धाक घालती, त्यांच्या गंज्या काढून नेती । नाहींतर पेटवुन देती । लोकांच्या घरोदर जाती । गाइवासरं धरुन कांपिती । बायकांना ओढुन नेती । त्यांची घरं समदी धुंडती। पैसा अडका लुटून नेती । मग हातीं दिवटी घेऊन आगी लावती ॥ जंवा लोक रडाया लागती । तंवा सारे खो खो हांसती । त्यांच्या तोंडांत फेकती माती । इरसाल शिव्या मग देती । जर कोण अंगावर येती । तर त्यांन दोऱ्या बांधती । आधीं त्याचं नाक कांपिती । लोखंडी सळ्या मग घेती । लाल भडक त्यांना करिती । मग डोळ्या मधनं खुपसती । मग हातपाय तोडती । अस हाल करुन मारिती । नाहींतर सुन्ता करुन माई बनविती ! ॥ ( चाल—आहिली ) ॥ मराठी राज्याची कळी । नवी उमलली । तिच्यावर आली । टोळांची धाड; काय होणार । कळेना काय काय घडणार । दैवाचे खेळ कसे हो कळणार ! ॥ २ ॥

---

## ( चौक ३ रा. )

ही वार्ता कळलि शिवाला । सावध झाला । गेला पन्हाळ्याला । करून बंदोबस्त सगळा । किल्ल्यावर दारुगोळा चढला । तय्यार सारा लोक झाला ॥ नुकत्याच प्रतापगडाखालीं । झालेल्या भारी । लाल तलवारी । पुन्हां पन्हाळगडावरती दिसल्या । वीरांच्या हातामध्नं रमल्या । तहानेनं व्याकुळ लइ झाल्या ॥ सूर्याच्या किरणांनी सारे । चमकले भाले । तय्यार झाले । चिरण्याला कंठनाळ सगळे । डोक्यावर जिरे टोप चढले । हातांत धनुर्बाण आले ॥

अन्नाचा पुरवठा केला । तय्यार झाला । तोंड देण्याला । यवनाला मराठ्याचा गोपाळ । यवनाला मराठ्यांचा भूपाळ । यवनाला हिंदधर्माचा लाल । यवनाला हिंददेवीचा बाळ । काळाचा काळ्याकुट्ट कळिकाळ ॥ ' शिवराया पन्हाळगडावर ' । ऐकुन् सुभेदार । शिद्दी जोहार । फाजलखानासकट तिकडे वळला । झटकन् किल्ल्याखालीं आला । किल्ल्याला त्यांचा वेढा बसला ॥ ( चाल ) ॥ नेताजी पालकर शूर । त्यानं केलं शिद्दीला जेर ॥ परि फौज होति भरपूर । म्हणून होता शिद्दीला जोर ॥ चौक्यांचा पहारा चौफेर । चहुकडे ठेविले हेर ॥ करि नाचे नंगी तलवार । रक्ताला झाली आतूर ॥ ( चाल ) ॥ झाले आठ महिने तरि होता शिद्दी जोहार ॥ वेढा काढुन जाईना; मग केला शिवानं विचार ॥ नेताजी, बाजी रणगाजी जमविले वीर ॥ मग त्यांना बोलला शिवबा जें ऐकावं सार ॥ " किती दिवस असं हें जमणार ? । दोन वर्स वेढा बसणार । एक वर्स अन्न पुरणार । मग अन्नपाणि सरणार । तंवा उपासमार होणार ॥ यवनांच्या पाया पडणार । का उपाय आतांच करणार ? " । मग बोलले शूर सरदार । " कांही तोड आतांच काढुन व्हावं हो पार " ॥ असा त्यांचा बेत जंवा झाला । तंवा राजा शिद्दीकडं गेला । ऐका जी काय बोलला । " तुमचं पडलं फार भय मला । द्यावं जीवदान हो मला । ग्यावं पदरीं दीन लेकराला । शहाचा अपराध मी केला । म्हणून आतां पश्चात्ताप झाला । देतों त्याच्या मुलखाला । हा किल्ला ठेवा पण मला । हा दास शरण तुम्हांला " । असं बोलला सुभेदाराला । शिद्दीला आनंद झाला । मग बोलला शिवरायाला । " जीवदान आतां तुला दिला । पर किल्ला पाहिजे आम्हांला । तो नाहीं मिळणार तुला " । जरा दादा द्यावं चित्ताला । सांगीन आतां तुम्हाला । शिवाजी फिरून शिद्दीला काय बोलला ॥ " सुभेदार थोर तुम्ही झालां । अन् किल्ला नाहीं म्हणतां कां मला ! । द्यावं आतां येवढं पोराला । द्यावं येवढं वचन लेकराला । आज काय विचार तो करा । पुन्हा उद्यां येइन भेटिला । तंवा काय तें सांगावं

मला " । असं बोलून डाव करून किल्ल्यावर गेला ! ॥ ( चाल ) ॥ आनंद फार तंव झाला । शिद्दी जोहाराला । धरून दाढीला । बोलला-- " अल्ला ! डाव केला । काफर त्रास आतां धरला " । पण त्याचा कावा काय रे कळला ! ॥ ३ ॥

---

## ( चौक ४ था. )

समेटाचा बहाणा असा केला । गाफिल झाला । पहारा ढिला पडला । दारुला आला ऊत अनिवार । झिंगुन गेले अमीर सरदार । खरोखर वेडा शिद्दी जोहार ॥ जो हार सिद्दीचा झाला । रामीं रत झाला । तो कां जोहा-राला । करिल रावजी ! सांगा जोहार । जाईल त्याला काय शिव हार । त्याला सारी हार जाणार हार ! ॥ जोहार बोलला आपणाला । " यंव रे उंदराला । पिंजऱ्यांत धरला । घेऊन जातों विजापुरला । पळ्यानंच त्याला कैद केला । दुसऱ्यांना डाव नाहिं जमला " ॥ फाजलखान बोलला आपणाला । " सूड पुरा झाला ! । कापुन शिवाजीला । बेशिला हा मर्द मुंडकं टांगणार ! । बापाचं देणं सारं फेडणार । मोठा मग मानकरी मी होणार ! ॥ ( चाल ) " आशेचा असा डोलारा । फाजलानं मनांत उभा केला । विसरला देहभा-नाला । दारुनं झिंगुन गेला ! । इकडं विचार काय मग झाला । शिवाजीनं काय बेत केला । ऐकावं सांगतों तुह्मांला । हेरानं आणल खबरेला । लगब-गीनं बोलला राजाला । " महाराज ! ऐका वचनाला । आज पहारा ढिला लइ झाला । जेंवा गेलों होतों फिरण्याला । झोंप आली होती पहाऱ्याला । अर्ध मुर्ध होतं जागेला । त्यांचं बोलणं आलं कानाला । त्यांचं ह्मणणं दिसलं हो मला । आज गनिम हातीं लागला । कां वेर्थ ध्यावं तसदीला ? । अन् त्रास आपल्या जीवाला ? । लइ दिवस रात्त जागुन वेडा जीव झाला । आतां पहारा सारा झोंपला । चौकीवाला जोरसे पेंगला । अशी बातमी घेऊन आलों । हा दास आपल्या चरणाला । आणी काय सांगावं मला । मरणाला तय्यार हा झाला । पुढंच मागणं नाहिं हो मला । तें आपलं ठाव आप-णाला " । असं बोलून बातमी देऊन हेर तो गेला ॥ शिवाजीनं काय बेत

केला । निवडक घेतल लोकाला । आणि किल्ल्याखालीं निघाला । दादा ! किल्ला सारा उतरला । वायसं कळलं नाहिं कोणाला ! रात्रिला घोर लागला । चहुकड काळोख झाला । जंवा कृष्ण जन्म बघा झाला । तंवा भूल पडली पहाऱ्याला । टोपलीत घालुन लेकराला । वसुदेव वाड्यांतुन आला । तरी कळलं नाहीं कोणाला ! । यमुनेला उतार झाला । तंवा पार पलीकडे गेला । असं लहानगं बाळ घेऊन गोकुळांत गेला ॥ थेट तश्शी भूल पहाऱ्याला । बघा पडली ! एक योग झाला । ह्मणुन कृष्ण ह्मणावं शिवाला । शिव कृष्ण रुप हो झाला । भेदभाव नाहींसा झाला । चौकीवाला घोरूं लागला । सारा पहारा गारद केला । शिवाजी पुढं मग गेला । जितका त्याला पहारा भेटला तितका गार केला । रगताचा पाट चालला । पर कळलं नाहिं कोणाला । पिंजऱ्यांतून पक्षी उडाला । करा जागं आतां शिद्दीला । करा जागं आतां फाजलाला । बघा ह्मणावं बेरकी उंदराला । बघा ह्मणावं आतां काफराला । हातावर तुरी देऊन तुमच्या हो गेला ! ॥ नुकताच प्रतापगडाला । उंदरानं बकरा मारला । आज इश्नं वेड्या फसवून उंदीर गेला ! ! ॥ ( चाल ) गर्वाचं घर सदा खालीं । असं लिहिलं भाळीं । सत्याचा वाली । सदा प्रभुराय झाला गोपाळ । पार्थालाच घातली कीर्तिनं माळ । खळाचा नंदवाळ हा काळ ॥ ४ ॥

---

## ( चौक ५ वा. )

दोन घटका गेल्यावर झाला । मोठा गलबला । जो तो ह्मणे ' अल्ला ! । गारद केला सारा पहारा । रगतानं रस्ता सारा भरला । देखो सैतान पार झाला ' ॥ तंवा आला शिद्दी जोहार । रक्ताचा पूर । पाहुन झाला गार ! । चित्तावर आली दुःखाची स्वार । राग पर त्याचा झाला अनिवार । म्यानांतुन ओढली त्यानं तलवार । फाजलखान झाला बेफाम । सुटला त्याला घाम । जिरला सारा जोम । ह्मणे ' क्या हुवा अल्ला ! गेला ' ! अल्ला काय सांगणार तुजला । त्याचा तुला कावा नाहिं कळला । मग जोडणी केली लवकर । चालले हो स्वार । बारा हजार । पाठलाग केला त्यानीं जोरदार । फौजेवर

होते दोन सरदार । फाजल आणि शिद्दी अजीज सुभेदार ॥ ( चाल ) पुढं धांवे सूर्य पाठीमागें केतु असूर ॥ पुढं चालला चंद्र मागं लागला राहु जणुं चोर ॥ पुढं धर्म मागं अधर्म धांवतो स्वैर ॥ पुढं नीति मागं अनीतीचा लागला विचार ॥ स्वातंत्र्य पुढें मागं लागे दास्य चिरकाळ ! ॥ रात्रिनं काळोख केला । दिसेना कांहिं कोणाला । चांदण्यांनीं नाच बंद केला । आभाळांतुन चांद निघाला । शिवाच्या डोईवर आला । त्यांनीं कां हो नाच बंद केला । असं म्हणतां ? सांगतों तुम्हाला । शिव घोड्यावरती स्वार झाला । अन् चालला दौड विशाळगडाला । त्याच्या भाळीं चंद्र शोभला । पाहवेना दैत्य राहुला । चंद्राला आतां गिळण्याला । शिवामागं राहू लागला । पाहवेना त्यांना हा चाला । अन्याय शिरजोर झाला । आणि धांवतो न्याय चिरण्याला ॥ म्हणुन त्यांनीं नाच बंद केला । ढगाच्या ओढलं पडद्याला । अन् सांगायला गेल्या सूर्याला । ऐका बोलल्या काय सूर्याला । "असा असा प्रकार झाला । आमचा पती पृथ्वीवर गेला । त्याच्या मागं राहु लागला । त्याला सोडवायला हो चला" । इकडं काय प्रकार झाला । ऐका जी सांगतों तुम्हांला । भर रात्रीं घोडा फेकला । झाले चार तास हो त्याला । वारा मंद वाहूं लागला । पहाटेचा सुमार झाला । विशाळगड दिसूं लागला । तीन कोस किल्ला राहिला । आनंद झाला शिवाला । काय बोलला ऐका लोकांला । अंबेनं कृपा करून तारलं आम्हांला ॥ आतां राहिलं नाहीं भय मला । आवाज पण झाला ? । टप् टप्-- टप्' ह ! आला । आला ! शत्रु पाठीवर आला । चला मारा टांचा घोड्याला । चला गाठलं पाहिजे किल्ल्याला" प्रसंग जीवावर आला । पुन्हां घोडा दौड धांवला । घोड्यांना फेस वधा आला । फाजलखान पाठीवर आला । जीव सारा कासाविस झाला । पर शिवा नाहिं वधा भ्याला । पुढच्या चौकीं सांगिन पुढचा प्रकार जो झाला ॥ ( चाल ) ॥ आली आणीबाणीची वेळ । युद्ध जंजाळ । रक्तबंबाळ । झाल्यावर कोण कोण मरणार । झाल्यावर काय काय घडणार । आपणाला सांगा कसं हो कळणार ? ॥ ५ ॥

---

( ... चौक ६ वा. )

जंवा तांबडं फुटलं पूर्वेला । गलिम शिवाजिला । येउन तंवा भिडला । परि राव नाहिं शिवा डरला । तसाच रे झुजण्याला झाला । थोरांना जीव क्षुद्र गमला ॥ त्याला नव्हतं जिवाचं भय । होता निर्भय । वाटलं परि भय । दुसऱ्यांना शिवा प्राणाहुन प्यार । राज्याचा तेवढा एक आधार । अंबेच्या कंठामधला शिरहार ॥ देशाच्या ऐका जी कार्जी । नित्य जो राजी । तोच रणगाजी । बाजी प्रभु देशपांडे सरदार । चित्ताचा होता मोठा दिलदार ! शौर्याचा मूर्तिमंत अवतार ॥ (चाल) ॥ शिवरायानं चाल केली जंवा विशाळ-गडावर ॥ विशाळगडला होतां तंवा बाजी किल्लेदार ॥ शिवबाच्या गोड शब्दानं केला फितूर ॥ छे ! फितूर कसला ! मनावरचा मोह गेला पार ! ॥ चाल ॥ विजापुरचा बाजी तांबेदारी । विशाळगडावरी । देशाचा वैरी । होता, पर आला शरण रायाला । शिर चरणिं त्याच्या ठेउन, किल्ला स्वाधीन, करून आपण दास चिर झाला ॥ ( चाल ) ॥ पाहुन अमला घोर प्रसंग बाजी पुढं झाला ॥ स्वातंत्र्यवीर रणगाजी बोलला शिवाला ॥ " महाराज ! विनवि तुह्माला । ऐकावं माझ्या शब्दाला । शत्रु हा हांकेवर आला । ही खिंड भली हो मला । इथ राहुन धरतों शत्रुला । चार लोक पुरती हजाराला । द्या संधि एवढी दासाला । करामत दावतों तुह्मांला । तंवर आपण किल्ल्याकडं चला ! आपण संग घ्यावं फौजेला । पांचपन्नास ठेवावं मला । जीव चरणिं आपल्या वाहिला । जंवर जीव नाहिं रणिं गेला । तंवर धोका नाहीं तुह्मांला । फेका दौड आतां घोड्याला । बोलण्यांत फार वेळ गेला । आपण आमचं देव दुजा नाहिं आह्मांला ॥ ऐकून अशा बोलाला । शिवाचा गळा दाटला । ( चाल ) भर आला त्याच्या हृदयाला, पाहुन प्रेमचंद्राला ॥ पाण्याचा लोट खळखळला, उसळून बाहेर आला ॥ ( चाल ) ॥ शिवाला आला कळवळा । काय बोलला ऐका ! बाजीला ॥ ( चाल ) ॥ ह्मणतील लोक काय मला, देऊन तोंडाला, एका बाजीला निष्ठुर गेला । काहि दया नव्हती हो त्याला ॥ जसा जीव प्यारा हो मला, तसाच तुह्माला, सांगू कसं बोला, जीव देण्याला !, आग लागो माझ्या तोंडाला ॥ शत्रूंचा वणवा पेटला, जाळत आला, जाळुंदे मला, मरण

देहाला, खास मग त्याला । जपणूक कशाला बोला ? ॥ ( चाल ) ऐकोनि राजवचनाला, बाजीला शोक बहु झाला ॥ तो वीर फिरुन शिवाला, ऐकावं काय बोलला ॥ ( चाल ) ॥ हा जीव प्यारा हो मला, ह्मणून देहाला, टाकुन धरणीला, जातों स्वर्गाला । द्या संधि एवढी दासाला ॥ देहाच्या पिंजऱ्यांतून बाहेर काढुन, स्वैर भटकून, होइ सुख त्याला । मग जास्त, वाटतं आह्मांला । महाराज आत्मा अमर, देह जाणार, उद्यां फारतर, सोडू कां वाया । पर्वणी अशी ही राया ॥ ज्याला मृत्यु लाभला रणीं, देशाकारणीं, धर्माकारणीं, त्याची हो जनीं, धन्य ही काया । द्या संधि येवढी दासा या ॥ (चाल) ॥ विजापुरचा होतों नोकर । तंव्हा केलं पाप मी फार । पण आला योग लवकर । झाली भेट विशाळगडावर । आपण केला सारा मोह दूर । चरणांचा घेतला आधार । बेइमान होतों मी फार । आज डाग धुवून काढणार । आपण जावं आतां लौकर ” । शिवबानं केलं उत्तर । “ तुह्मासाठीं जातों लौकर । जेंव्हा जाईन विशाळगडावर । पांच तोफा सोडिन सत्वर । मग समजा झालों मी पार । अस म्हणून चालले शिवराय होवुनी स्वार ॥ ( चाल ) ॥ मग बाजी झाला तय्यार । रोखुन खिंडार । नंगी तलवार । हातामधिं, झाला रुद्र अवतार । सांगिन जी पुढं पुढचा प्रकार । मह्राष्ट्र चौकाचा झाला आकार ॥ ६ ॥

---

## ( चौक ७ वा. )

शिवबांची घोडी कल्याणी । सदा जयदानी । घोड्यांमध्यें राणी । खडकाळ डोंगरामधूनी । तशीच मैदानी जशी काय हरणी । टाण टाण् करुनि धांवतांना पाहिली यवनांनीं । ‘ इस्कु पकडो ’ ह्मणुनी । चाल केली त्यांनीं ॥ चौफेर घोडे सुटले । खिंडींतून आले बाण सळसळले । सणणणण करुन अंगीं घुसले । घोडे धडाधडा खालती पडले । घोडेस्वार थंडगार झाले ॥ बाण येती कुठून समजेना । डसती घोड्यांना । धांवत्या सापांना । जशा काय झडपा घालती हो घार । झाली निम्मी फौज त्यांची थंडगार । रागानं झाले लाल सुभेदार ॥ पाठलाग तसाच करण्याला । जोरानं आला । फाजल खिंडीला । परि त्यानं पाहिलं बाजीप्रभुला । तीस जण घेऊन राहिला

तोंडाला । खिंडीचा रस्ता बंद झाला ॥ जसा राम दिसला रावणाला । कृष्ण कंसाला । भीम कीचकाला । बाजीप्रभु तसा फाजिलाला । दिसला पर जोर त्याला चढला । बाणांचा त्याला मुगावा कळला ॥ बाजीच्या लहानग्या टोळीला । पाहुन फाजलाला । हर्ष फार झाला । कां हो ? त्याचं सैन्य होतं अनिवार । इकडं पांच पन्नास बाजीच स्वार । तिकडं फाजलाचे बारा हजार ॥ ( चाल ) ॥ फाजलानं केला मग हल्ला । बाजीही तय्यार झाला ॥ रणरंग खिंडीला आला । कचटाळी वीर मरणाला ॥ ( चाल ) ॥ आली झुंज हात घाईवर । झुलती तलवार । एकमेकां मार । देती; धुनाकूळ झाला अनिवार । शत्रूवर करती जोराचे वार । जिकड तिकड झाला एक प्रकार ॥ किती होते मिसळले नाद । देऊं कशि याद । उठति पडसाद । खिंडीतून दाद नाहिं कवणा । तय्यार सारे वीर मरणा । टेवील कोण त्यांची गणना ॥ (चाल) ॥ कोण राम राम बोलती । देवांना हांका मारती । कोण धाय धाय रडताती । तळमळुन देहांतुन कोण प्राण सोडती । कोणाचीं नाकं टैंचती । डोळ्यालं बुबळं लोंबती । छातिलं भाले खुपसती । जसे मासे जळीं चमकती । आकाशीं विजा तळपती । तलवारी तशा लखलखती । रक्ताचे पाट वाहती । डोक्यांच्या कपऱ्या उडती । कोणाचे हात तूटती । बेशुद्ध कैक रक्ताच्या पाटामधिं पडती ॥ निकराचे हल्ले चढविती । ‘ हर हर महादेव ’ असें कैक बोलती ॥ ‘ दीन दीन ’ यवन बोलती । किती अर्धमेले वरळती । ‘ हाणा मारा कापांचा ’ भरला नाद हो अती ॥ शिरकमळं अंबेच्या पायिं वीर वाहती ॥ दशदिशा दणाणुन जाती ! तलवारी भाले चमकती । एकमेकां घासुन ठिणग्या लाल निघताती ॥ वर मुंडकीं उंच उडताती । जणु अंबाबाई चेंडवाचा खेळ खेळती ॥ ऐका जी त्याच वेळेला । विजयश्री आली वरण्याला । तिनं हातीं धरलं माळेला । ‘ माळ घालं आतां कवणाला ’ । अशि चिंता पडली हो तिला । जगदंबा बोलली मृत्यूला । काय ऐका सांगतों तुम्हांला । “ आली विजयदेवी वरण्याला । अशि वर्दी द्यावी बाजीला । आणि करा थाट चांगला ” ॥ “ ठीक ! करतों ” मृत्यु बोलला । आणि शिस्त कराया लागला । लाल रंग खिंडीला दिला । रक्ताचा सडा घातला । धडाचा कारंजा केला । मासाचा गालिचा केला । हाडांच्या नक्षी काढल्या । दातांच्या